**प्रेसनोट** **दिनांक ०४/०७/२०१९**

## बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर

## बंडगार्डन पोलीसांकडून दिघी पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गु.र.न-३७९/२०१८ भा.द.वि. कलम-३७९ मधील तवेरा गाडी जप्त केले बाबत.

दि.०४/०७/२०१९ रोजी**बंडगार्डन पोलीस स्टेशन अंकितताडीवाला रोड पोलीसचौकीस**चौकीचे अमंलदार पो ना.८७०१ केंद्रेताडीवाला बीट मार्शलचे पो शि ७५५४ जाधव व पो शि १०११७ सावंत हे दिवसपाळी कर्तव्य करीत होते. ११/०० वा सुमारास पोलीसनियंत्रणकक्ष यांनी कळविले की हॉटेल पंचरत्न समोरील रोडवरएकचारचाकीगाडी बेवारसस्थितीत उभी आहे. माहिती प्राप्त होताच तात्काळ ताडीवाला रोड पोलीसचौकीचे अमंलदार पो ना.८७०१ केंद्रे ,बीट मार्शलचे पो शि ७५५४ जाधव व पो शि १०११७ सावंत असेगेले असतात्यांना हॉटेल पंचरत्न समोरील रोडवरएक सिल्व्हर रंगाची आर टी ओक्र-एम एच-१२ एन जी ३९१६ असलेलीतवेराचारचाकीगाडी मिळून आली. सदरगाडीचेनंबर वरुन अधिक माहीती घेतली असता सदरगाडीदि. २९/१२/२०१८ रोजी संध्याकाळी ०९/०० ते दि.३०/१२/२०१८ रोजी सकाळी १०/०० वा.चे सुमारास पुणे आळंदी सर्व्हिस रोडवरगणपती मंदीराजवळ शिवनगरी वडमुखवाडी येथुनचोरी झाली होती. सदर बाबतदिघी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं-३७९/२०१८ भा.द.वि.कलम-३७९अन्वये गुन्हा दाखल असल्याची माहीती प्राप्त झाली. तात्काळ दिघी पोलीस स्टेशनशी संपर्क साधुनत्याबाबतखात्रीकरुन सदरगाडीचा जप्ती पंचनामाकरुन पुढीलतपासकामीदिघी पोलीस स्टेशनच्याताब्यातदिली. सदरतवेरागाडी मिळून आल्याचेफिर्यादी यांना माहिती मिळताच, त्यांनी पोलीसांचे आभार मानले.

सदरची चांगली कामगिरी बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील ताडीवाला पोलीस चौकीचे अमंलदार पोना. केंद्रे ताडीवाला बीट मार्शलचे पो शि किरण जाधव व पो शि प्रकाश सावंत यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे